# वाल्मी प्रशिक्षणांवर आधारीत
# प्रगतिशील शेतकरी प्रशिक्षणांच्या प्रभावांचा अभ्यास

## संशोधन अभ्यास अहवाल


डॉ. राजेश पुराणिक
प्राध्यापक व प्रमुख

डॉ. मोहन नारखेडे
सहायक प्राध्यापक


## सामाजिक शास्त्रे विदया शाखा

## वर्ष २०१९-२०


## जल व भूमि व्यवस्थापन संस्था, वाल्मी, औरंगाबाद

पोस्ट बॉक्स नं. ५०४, कांचनवाडी पैठण रोड, औरंगाबाद महाराष्ट्र

संपर्क क्रमांक: 0240-2379159-60, Fax No.- 0240-2379036

Website : www.walmi.org,

E-mail : walmitmc@walmi.org & sosci@walmi.org

**कोर टीम:**

डॉ. राजेश पुराणिक, प्राध्यापक व प्रमुख, सामाजिक शास्त्रे विदयाशाखा, वाल्मी, औरंगाबाद
डॉ. मोहन नारखेडे, सहायक प्राध्यापक, सामाजिक शास्त्रे विदयाशाखा, वाल्मी, औरंगाबाद
श्री. बी.एम.शेटे, सेवा निवृत्त सहायक प्राध्यापक, सामाजिक शास्त्रे विदयाशाखा, वाल्मी, औरंगाबाद

**माहिती - आधार माहिती (डाटा) संकलन**

श्री. बी.एम.शेटे, सेवा निवृत्त सहायक प्राध्यापक, सामाजिक शास्त्रे विदयाशाखा, वाल्मी, औरंगाबाद

**माहिती - आधार सामग्री (डाटा) संस्करण (प्रोसेसींग)**

श्री. बी.एम.शेटे, सेवा निवृत्त सहायक प्राध्यापक, सामाजिक शास्त्रे विदयाशाखा, वाल्मी, औरंगाबाद
डॉ. मोहन नारखेडे, सहायक प्राध्यापक, सामाजिक शास्त्रे विदयाशाखा, वाल्मी, औरंगाबाद
श्री एम. ए. वाणी, कार्यालयीन यंत्र चालक - सहायक, सामाजिक शास्त्रे विदयाशाखा, वाल्मी, औरंगाबाद

**कार्यालयीन कर्मचारी**

श्री ए.टी.मोटे, कनिष्ठ लिपिक, सामाजिक शास्त्रे विदयाशाखा, वाल्मी, औरंगाबाद

**अहवाल संपादन**

**डॉ. दत्तात्रय ह. पवार, सेवानिवृत्त प्राध्यापक व प्रमुख, कृषी विदयाशाखा, वाल्मी औरंगाबाद**

**अहवाल लेखन व सादरीकरण**

डॉ. राजेश पुराणिक, प्राध्यापक व प्रमुख, सामाजिक शास्त्रे विदयाशाखा, वाल्मी, औरंगाबाद

**@सर्वाधिकार (कॉपी राईट) सूरक्षित-** वाल्मी, औरंगाबाद

**प्रकाशन वर्ष २०१९-२० प्रथम आवृत्ती: डिसेंबर २०१९**

## जल व भूमि व्यवस्थापन संस्था, वाल्मी, औरंगाबाद

**पोस्ट बॉक्स नं. ५०४,**

**कांचनवाडी पैठण रोड, औरंगाबाद महाराष्ट्र**

**संशोधन अभ्यासाची माहिती व अभ्यास गट**

| | |
|---|---|
| संशोधन अभ्यासाचे शीर्षक | वाल्मी प्रशिक्षणांवर आधारीत प्रगतिशील शेतकरी प्रशिक्षणांच्या प्रभावांचा अभ्यास |
| संशोधन अभ्यास घेणा-या संस्थेचे नांव | जल व भूमि व्यवस्थापन संस्था, वाल्मी, औरंगाबाद पोस्ट बॉक्स नं. ५०४, कांचनवाडी पैठण रोड, औरंगाबाद महाराष्ट्र |
| संशोधन अभ्यास करणा-या शाखेचे नांव | सामाजिक शास्त्रे विदयाशाखा, वाल्मी, औरंगाबाद |
| संशोधन अभ्यासाचे प्रेरणास्थान व मार्गदर्शक | श्री दिपक सिंगला, महासंचालक वाल्मी व आयुक्त मृद व जल संधारण विभाग, आयुक्तालय, वाल्मी औरंगाबाद<br>श्री व्ही.बी.नाथ, अधिक्षक अभियंता व सह संचालक, वाल्मी औरंगाबाद |
| संशोधन अभ्यासाचे मुख्य मार्गदर्शक, समन्वयक व अहवाल लेखक | डॉ. राजेश पुराणिक, प्राध्यापक व प्रमुख, सामाजिक शास्त्रे विदयाशाखा, वाल्मी, औरंगाबाद |
| संशोधन अभ्यासातील सह समन्वयक | डॉ. मोहन नारखेडे, सहायक प्राध्यापक, सामाजिक शास्त्रे विदयाशाखा, वाल्मी, औरंगाबाद (डेटा विश्लेषण)<br>श्री. बी.एम.शेटे, सेवा निवृत्त सहायक प्राध्यापक, सामाजिक शास्त्रे विदयाशाखा, वाल्मी, औरंगाबाद (डेटा कलेक्शन व विश्लेषण) |
| संशोधन अभ्यासाचे वर्ष | २०१९-२० |
| संपर्क पत्ता | संपर्क क्रमांक: 0240-2379159-60, Fax No.- 0240-2379036<br>Website : www.walmi.org,<br>E-mail : walmitmc@walmi.org & sosci@walmi.org |

**संशोधन अभ्यासाचा अहवाल**

**जल व भूमि व्यवस्थापन संस्था, (वाल्मी) औरंगाबाद**

**संस्थेच्या संशोधन समितीस सादर**

# जल व भूमि व्यवस्थापन संस्था, वाल्मी, औरंगाबाद

**पोस्ट बॉक्स नं. ५०४, कांचनवाडी पैठण रोड, औरंगाबाद महाराष्ट्र**

## अनुक्रमणिका


| प्रकरण | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | संशोधन अभ्यासाची माहिती व अभ्यास गट | iv |
| | प्रस्ताविक- मा. महासंचालक, वाल्मी औरंगाबाद | vii |
| | प्रकाशनाच्या निमित्ताने - मा. अ.अ. व सह संचालक वाल्मी औरंगाबाद | viii |
| | मनोगत व आभार | ix |
| १ | प्रस्तावना<br>१.१ पार्श्वभूमि<br>१.२ उददेश्य<br>१.३ संशोधनाचे मुख्य प्रश्न<br>१.४ अहवालाचे सादरीकरण | १ ते ३ |
| २ | संदर्भावलोकन<br>२.१ प्रासंगिकता<br>२.२ प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना व राज्य शासनातर्फे छत्रपती राजाराम महाराज उदयोजकता व कौशल्य विकास योजना<br>२.३ पाणी फाउंडेशनची प्रशिक्षण आधारीत वाटचाल | ४ ते १० |
| ३ | संशोधन अभ्यास पध्दती, विश्लेषण व सांख्यिकी पध्दती<br>३.१ अभ्यासाचे प्रभाव क्षेत्र<br>३.२ प्रशिक्षण वर्षांची निवड<br>३.३ प्रशिक्षण तुकडया व प्रशिक्षणार्थींची निवड<br>३.४ प्रश्नावली तयार करणे<br>३.५ प्रतिसाद/अभिमत संकलन पध्दत<br>३.६ अभिमत सारणीकरण व विश्लेषण<br>३.७ सांख्यिकी पध्दतींचा वापर<br>३.८ विश्लेषणासाठी निवडलेल्या घटकांचे संशोधनपूरक अर्थ/व्याख्या व त्यांचे मोजमाप<br>३.९ अहवाल लेखन | ११ ते १९ |
| ४ | प्रभावांचे विश्लेषण<br>भाग-४.१ वैयक्तिक बाबी<br>भाग-४.२ सामाजिक आर्थिक बाबी<br>भाग-४.३ मानसिक बाबी- शेती विषयक बाबी व त्यावर प्रशिक्षणोत्तर पडलेल्या प्रभावाचे विश्लेषण<br>• माती व पाणी परिक्षण<br>• सूक्ष्म सिंचन<br>• प्रशिक्षण पध्दती<br>• वाल्मी प्रकाशनांची उपयुक्तता | २० ते ४९ |

| प्रकरण | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | • शेतीतील बदल<br>• पाणी वापर संस्था<br>• प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष लाभ (उत्पन्नातील)<br>• कृषी - आधुनिक लागवड | |
| ५ | संशोधनात आलेल्या अडचणी व उपाय योजना<br>५.१ शेतकऱ्यांना प्रशिक्षणातील विषयांचे अनुकरण करण्यासाठी प्रशिक्षणोत्तर आलेल्या अडचणी व अपेक्षा | ५० ते ५२ |
| ६ | सारांश व शिफारशी | ५३ ते ६१ |
| ७ | परिशिष्ट - १ ते ४ | ६२ ते ७४ |
| ८ | तालिकांची यादी | |
| | तालिका ३.१: वाल्मी औरंगाबाद येथे आयोजित प्रगतिशील प्रशिक्षण कार्यक्रमातील सहभागी शेतक-यांची वर्षवार माहिती | |
| | तालिका ३.२: वाल्मी औरंगाबाद येथे आयोजित प्रगतिशील प्रशिक्षण कार्यक्रमात भाग घेतलेल्या शेतक-यांमधून संशोधनासाठी निवडण्यात आलेल्या शेतक-यांची विभागवार माहिती | |
| | तालिका ३.८.१ संशोधनासाठी निवडलेल्या घटकांचे वर्गीकरण | |
| | तालिका ४.१.१ शेतक-यांच्या वैयक्तिक बाबींचे विवरण | |
| | तालिका ४.२.१ शेतक-यांच्या सामाजिक-आर्थिक बाबींचे विवरण | |
| | तालिका ४.३.१ माती व पाणी परिक्षण विषयाबाबत प्रगतिशील शेतक-यांचे प्रशिक्षणपुर्व व प्रशिक्षणोत्तर अभिमतांचे विश्लेषण | |
| | तालिका ४.३.२ सूक्ष्म सिंचन विषयाबाबत प्रगतिशील शेतक-यांचे प्रशिक्षणोत्तर अभिमतांचे विश्लेषण | |
| | तालिका ४.३.३ प्रशिक्षण पध्दतींबाबत प्रगतिशील शेतक-यांचे प्रशिक्षणोत्तर अभिमतांचे विश्लेषण | |
| | तालिका ४.३.४ वाल्मी प्रकाशनाबद्दल प्रगतिशील शेतक-यांचे प्रशिक्षणोत्तर अभिमतांचे विश्लेषण | |
| | तालिका ४.३.५ वाल्मी प्रशिक्षणानंतर शेतीत झालेले बदल बाबत प्रगतिशील शेतक-यांचे प्रशिक्षणोत्तर अभिमतांचे विश्लेषण | |
| | तालिका ४.३.६ पाणी वापर संस्था संबंधी माहिती बाबत प्रगतिशील शेतक-यांचे प्रशिक्षणपूर्व व प्रशिक्षणोत्तर अभिमतांचे विश्लेषण | |
| | तालिका ४.३.७ प्रशिक्षणानंतर झालेल्या प्रत्यक्ष लाभा बाबत शेतक-यांचे अभिमत | |
| | तालिका ४.३.८ प्रशिक्षणानंतर झालेल्या अप्रत्यक्ष लाभा बाबत शेतक-यांचे अभिमत | |

## प्रस्ताविक

संस्थेत प्रगतिशील शेतक-यांचे प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्याची सुदृढ परंपरा अनेक वर्षापासून चालत आलेली आहे. काळानुरूप या प्रशिक्षणांच्या विषयांमधे व स्वरूपामधे वेळोवेळी बदल करण्यात आलेले आहेत. शेतीच्या बदलत्या गरजांनुसार शेतक-यांना या प्रशिक्षणाचा उपयोग होतो किंवा कसे असे प्रश्न साहजिकपणे विचारण्यात येत होते. त्यामुळे संस्थेच्या संशोधन समितीने या बाबत अभ्यास करण्याची जबाबदारी सामाजिक शास्त्रे विदया शाखेकडे सोपविण्यात आली. त्यानुसार सन २०१० ते २०१५ या कालावधीत पार पडलेल्या प्रगतिशील शेतक-यांच्या प्रशिक्षण कार्यक्रमातील प्रशिक्षित शेतक-यांच्या प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी सामाजिक शास्त्रे विदया शाखेने नियोजन केले. प्रशिक्षण कार्यक्रमांच्या उपयोगितेबाबत प्रगतिशील शेतक-यांना आलेल्या अनुभवांवर आधारीत हा अहवाल असून प्राप्त प्रतिक्रिया शेतक-यांनी प्रकट केलेले अभिमत आहे. हे अभिमत शेतक-यांना झालेल्या वैयक्तिक लाभ हानिनुसार मर्यादीत असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे प्रगतिशील शेतक-यांसाठी आयोजित करण्यात येणा-या प्रशिक्षणांच्या उपयोगितेबाबत सर्वसाधारण धारणा त्याच्या प्रभावांचे विश्लेषण करण्याची होती. या संशोधन अभ्यासाचा अहवाल तयार झाला असून तो उपलब्ध करून देण्यात येत आहे. या संशोधन कार्याचे यशस्वी मार्गदर्शन, समन्वयन व अहवाल लेखन करण्यासाठी डॉ. राजेश पुराणिक, प्राध्यापक व प्रमुख, सामाजिक शास्त्रे विदयाशाखा, यांनी घेतलेल्या परिश्रमाची विशेष नोंद घेत त्यांचे अभिनंदन करतो. श्री बी.एम.शेटे, सेवानिवृत्त सहायक प्राध्यापक व डॉ. मोहन नारखेडे, सहायक प्राध्यापक यांनी आधार सामगीचे संकलन व विश्लेषण करण्यास महत्वाचे योगदान दिलेले आहे. यासाठी त्यांचे अभिनंदन. तसेच संशोधनासाठी ज्या शेतक-यांनी आपल्या प्रतिक्रिया निर्भिडपणे संस्थेस दिल्या त्यांचे विशेष आभार.

वाचकांना विशेष विनंती कि सदरील संशोधन अभ्यासाबाबत आपल्या सूचना सामाजिक शास्त्रे विदया शाखेस अवश्य कळवाव्यात जेणेकरून भविष्यातील प्रशिक्षण वर्गाचे आयोजन व संशोधन अभ्यासांसाठी त्यांचा वापर सुनिश्चित करता येईल. निरंतर सुधार करण्याच्या प्रयत्नातुन शेतक-यांसाठी उत्कृष्ट व उपयोगी साहित्य निर्माण करण्यास वाल्मी नेहमीच प्रयत्नशिल आहे.

धन्यवाद,

दिनांक:१२.१०.२०१९
स्थान : औरंगाबाद

**सही/-**
**(दिपक सिंगला)** भा.प्र.से.
**महासंचालक**
**वाल्मी, औरंगाबाद**

## प्रकाशनाच्या निमित्ताने

वाल्मी औरंगाबादतर्फे शेतक-यांसाठी आयोजित करण्यात येणा-या प्रमुख प्रशिक्षण कार्यक्रमांपैकी एक म्हणजे प्रगतिशील शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम होय. संस्थेच्या स्थापनेपासूनच धोरणात्मकरित्या संस्थेने सिंचनाशी निगडीत सर्वच भागधारकांच्या प्रशिक्षणाचे उदिदष्ट समोर ठेवले होते. त्यातील महत्वाची व्यक्ति शेतकरी. शेतातील सिंचन क्षमता वाढविण्यासाठी शेतक-यांना पाणी व्यवस्थापनेचे व सुयोग्य पीक नियोजनाचे प्रशिक्षण देण्यात वाल्मी अग्रणी आहे. अनेक वर्षांपासून प्रगतिशील शेतक-यांच्या प्रशिक्षणांतुन विविध पीकांच्या पाण्याच्या गरजांवर आधारीत सिंचन पध्दतींचा वापर राज्यात आपल्या प्रशिक्षणांच्या माध्यमांतुन रूजविण्यामधे संस्थेने आपले योगदान दिले आहे. परिणामी लाभक्षेत्रातील सिंचन क्षमता वाढुन मोठया प्रमाणात सूक्ष्म सिंचनासारख्या पध्दती शेतक-यांनी वापरायला सुरवात केली आहे.

संस्थेच्या प्रगतिशील शेतक-यांच्या प्रशिक्षणातुन शिकविले जाणारे विषय व त्यातून निर्माण होणा-या जल साक्षरतेतून काय संपन्न होत आहे हा प्रश्न नेहमीच विचारण्यात येत होता. त्यामुळे प्रगतिशील शेतक-यांच्या प्रशिक्षणांचा प्रभाव जाणून घेण्याचे कार्य संस्थेच्या सामाजिक शास्त्रे विदया शाखेकडे सोपविण्यात आले होते. त्यानुसार या शाखेने संशोधनाचा विषय निर्धारीत करून प्रशिक्षित शेतक-यांच्या प्रतिक्रिया जाणून घेतल्या. यासाठी सन २०१० ते २०१५ या पाच वर्षात प्रशिक्षित झलेल्या शेतक-यांशी संपर्क साधून प्रश्नावलीच्या माध्यमातुन एकत्रित केलेल्या माहितीवर/आधार माहिती (डाटा)वर आधारीत अहवाल तयार झाला असून तो या प्रकाशनात देण्यात येत आहे. अहवालातील माहिती व संशोधनाच्या निष्कर्षांमधील सूचनांनुसार येणा-या काळात सिंचन व्यवस्थापनेबाबत तंत्रज्ञान विकासासोबतच प्रचार प्रसाराचे मुददे महत्वाचे राहतील.

सामाजिक शास्त्रे विदया शाखेने या महत्वपूर्ण विषयांवर पूर्ण केलेल्या संशोधन अभ्यासासाठी डॉ. राजेश पुराणिक, प्राध्यापक व प्रमुख सामाजिक शास्त्रे विदयाशाखा, यांचे विशेष अभिनंदन. तसेच डॉ मोहन नारखेडे, सहयोगी प्राध्यापक, श्री बी.एम.शेटे सेवानिवृत्त सहाय्यक प्राध्यापक, सामाजिक शास्त्रे विदयाशाखा, वाल्मी औरंगाबाद यांनी केलेल्या प्रयत्नांसाठी त्यांचे अभिनंदन.

शुभेच्छा समवेत,

**सही/-**
**(वा.ब. नाथ)**
**अ.अ. व सहसंचालक**
**वाल्मी, औरंगाबाद**

दिनांक:१२.१०.२०१९
स्थान : औरंगाबाद

## मनोगत व आभार

प्रगतिशील शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम हा वाल्मीचा स्तुत्य व यशस्वी प्रयोग सिध्द होत आहे. अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या या प्रशिक्षणांतून वाल्मीने अनेक शेतकरी मित्र कमावले आहेत. अशा उपयोगी प्रशिक्षण कार्यक्रमांच्या प्रभावांचा अहवाल सादर करतांना अतिशय आनंद होत आहे. या प्रशिक्षणांच्या यशस्वितेसाठी ज्या ज्या लोकांनी आपले ज्ञान, कौशल्य व कर्तृत्व देय केले आहे त्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्याचे सौभाग्य मला प्राप्त झाले आहे. तसेच हा अहवालास तयार करण्यासाठी ज्या व्यक्तिंनी व संस्थांनी सहकार्य दिले त्यांच्या प्रति देखील कृतज्ञता व्यक्त करण्याची नैतिक जबाबदारी मुख्य मार्गदर्शक म्हणून असल्याची मला जाणीव आहे.

तद्नुसार सर्वप्रथम मी श्री दिपक सिंगला, भाप्रसे, आयुक्त तसेच महासंचालक वाल्मी, मृद व जल संधारण विभाग यांचे मन:पूर्वक आभार व्यक्त करतो की त्यांनी सामाजिक शास्त्रे विद्या शाखेस विश्वासपूर्वक हे संशोधन करण्यास सकारात्मक संमती देवुन प्रेरित केले. त्यांच्या पुढाकाराने या प्रशिक्षण आधारीत संशोधन अहवालासाठी आवश्यक सुविधा मिळाल्या व माहितीस सुसंगतरित्या सादर करणे शक्य होऊ शकले.

श्री.व्ही.बी. नाथ, अधिक्षक अभियंता व सहसंचालक यांचे विशेष आभार मानतो ज्यांनी वेळोवेळी संशोधन समितीच्या बैठका घेवून हा संशोधन अभ्यास पूर्ण करण्यासाठी मार्गदर्शन केले व प्रेरित केले. त्यांच्या प्रेरक भूमिकेमुळे हा संशोधन अहवाल वेळेत पूर्ण होवू शकला आहे.

वाल्मीतील सर्व विदयाशाखांचे विदयमान तसेच माजी प्राध्यापक व प्रमुख, विदयमान तसेच माजी प्राध्यापकवृंद ज्यांनी प्रगतिशील शेतकरी प्रशिक्षणाचा पाया तयार केला व एक निश्चित दिशा संस्थेला दाखवली त्या सर्वांचे मन:पूर्वक आभार व्यक्त करतो. वेळोवेळीचे महासंचालक, अधिक्षक अभियंता व सहसंचालक, प्रशासकीय अधिकारी, लेखाधिकारी व प्रशासन शाखेतील इतर अधिकारी व कर्मचारी यांचे आभार व्यक्त करतो.

संस्थेतील तांत्रिक कर्मचारी व अधिकारी वर्ग, शेतक-यांच्या प्रशिक्षणासाठी निवासस्थान व भोजन कक्षाच्या संचालनेतील कर्मचारी, पाणी, वीज व इतर सुविधांचे व्यवस्थापन करणारे कर्मचारी ज्यांनी प्रगतिशील शेतक-यांच्या वाल्मीतील निवासा दरम्यान त्यांना तत्पर सेवा उपलब्ध करून दिल्या ज्याच्या आधारे शेतकरी वाल्मीच्या सुखद आठवणी घेवून गेले, यासाठी त्या सर्वांचे आभार व्यक्त करतो.

प्रशिक्षण म्हणजे प्रचंड मोठे टीम वर्क असते. सुरवातीपासूनच या प्रशिक्षणांच्या व्यवस्थापनेची मुख्य धूरा सामाजिक शास्त्रे विदया शाखे जवळ असली तरी इतर विदयाशाखेतील प्रयोगशाळा, प्रकाशने, प्रदर्शन प्रक्षेत्रावरील व्यवस्था, कृती प्रात्याक्षिके इत्यादींच्या बाबतीतील व्यवस्था आणि माहिती शेतक-यांना वेळेवर मिळावी यासाठी

प्राध्यापकवृंद, तांत्रिक अधिकारी व कर्मचारी यांनी आपले योगदान दिले आहे या करीता त्या सर्वांचेच आभार व्यक्त करतो.

प्रशिक्षण कार्यक्रमातील विषयांचे सादरीकरण ही अत्यंत महत्वाची बाब आहे. शेतक-यांचे प्रश्न हाताळतांना, त्यांच्या शंका कुशंका दूर करतांना, त्यांच्या अडचणींचे योग्य समाधान करतांना प्रशिक्षकांना अति-सावध राहावे लागते. या सर्व कसोटींवर सर्वच प्रशिक्षकांनी व प्राध्यापकांनी त्यांचे सर्वोत्कृष्ट योगदान दिले असून वाल्मीच्या प्रशिक्षणाची अविस्मरणीय छाप शेतक-यांच्या मनावर उमटवण्याची किमया साधली आहे. यासाठी वाल्मीच्या सर्व प्राध्यापकांचे तसेच वेळोवेळी आमंत्रित पाहूणे व्याख्यात्यांचे विशेष आभार व्यक्त करतो.

या प्रशिक्षणा दरम्यान एक दिवसीय प्रक्षेत्र भेट आयोजित करण्यात येत होती. यासाठी विविध स्थानांतील शेतकरी, पाणी वापर संस्था, कृषि प्रक्षेत्र विकासाची कामे करणा-या संस्था, हिवरे बाजार, कडवंची, ओझर, राळेगण सिध्दी भेंडा फॅक्टरी, ईत्यादी गावे व त्यातील ग्रामवासी ज्यांनी कृषि, ग्राम विकास, सिंचन व्यवस्थापन ईत्यादी कार्यात सामुदायिकरित्या विकासाचा समतोल साधला व आपल्या कृतितुन दाखवून दिले की ग्राम विकासाची दिशा योग्य असल्यास प्रत्येकाला समान संधी मिळुन एकात्मिक विकास साधता येतो, त्या सर्व ग्रामवासी व शेतक-यांचे विशेष आभार व्यक्त करतो.

सामाजिक शास्त्रे विदया शाखेत अत्यंत प्रतिभावान प्राध्यापकांनी वेळोवेळी आपल्या योग्यतेनुसार या प्रशिक्षण कार्यक्रमांच्या आयोजनात योगदान दिले आहे. त्यांनी आपल्या सर्वोत्कृष्ट व्यवस्थापनेचा परिचय या प्रशिक्षणांच्या आयोजनात सादर केला आहे. ऐवढेच नव्हे तर प्रशिक्षणोत्तर शेतक-यांच्या अनेक प्रश्नांची उत्तरे, दूरध्वनी वरील विचारपूस, पत्रव्यवहार इत्यादी निरंतर ठेवून प्रशिक्षित शेतक-यांशी जीवंत संपर्क कायम ठेवला. आज संस्थेजवळ वाल्मी मित्र या भावनेने काम करणारे शेतकरी बंधु आणि भगिनी राज्याच्या कानाकोप-यात आढळुन येतात. ही परंपरा जोपासण्यात या शाखेच्या प्राध्यापकांचे अविस्मरणीय योगदान आहे. त्यांच्या कर्तव्यपरायणतेला नमन करून त्यांच्या प्रति आपली कृतज्ञता व्यक्त करतो.

प्रगतिशील शेतक-यांच्या प्रशिक्षणांमधे वेळोवेळी सहभागी झालेले सर्व शेतकरी बंधु आणि भगिनी यांचे हृदयापासून आभार व्यक्त करतो. तसेच सदरील अभ्यासासाठी ज्या शेतक-यांनी प्रतिसाद देवून आपल्या प्रतिक्रिया संस्थेस कळविल्या त्या शेतक-यांचे मन:पूर्वक आभार मानतो. अनेक व्यक्ति आणि शुभचिंतकांनी या प्रशिक्षणांच्या आयोजनात तसेच या संशोधन अभ्यासाच्या पूर्णत्वासाठी योगदान दिले आहे त्यांचे सर्वांचे मन:पूर्वक आभार व्यक्त करतो.

सदरील संशोधन अभ्यासाच्या नियोजनापासून तर पूर्णत्वापर्यंत सामाजिक शास्त्रे विदया शाखेतील प्राध्यापकांनी विशेष कष्ट घेतले आहेत. त्यांचा नामोल्लेख करून त्यांच्या योगदानाचा यथोचीत गौरव करणे मी माझे कर्तव्य समजतो. या कडीत सर्वप्रथम डॉ. बी.पी.काळे, सेवानिवृत्त प्राध्यापक व प्रमुख, श्री बी.एम.शेटे, सेवानिवृत्त सहायक प्राध्यापक, श्री. आत्माराम मोटे, क.लि., श्री वाणी, सेवानिवृत्त यंत्रचालक, श्री अंकुशकर, सेवानिवृत्त अ.ह.म. श्री भगवान केनेकर व अन्य कर्मचारी या सर्वांचे आभार व्यक्त करतो.

सामाजिक शास्त्रे विभागातील डॉ. मोहन नारखेडे, सहाय्यक प्राध्यापक यांनी सातत्य राखुन संयमितपणे समन्वयन साधला तसेच संशोधन अभ्यासासाठी आवश्यक माहितीची/आधार माहिती (डाटा)ची जुळवा जुळव, तालीका तयार करणे व आधार माहिती (डाटा) फेरतपासणीची कामे वेळेत केली. या कामासाठी लागणा-या धैर्याचे व संयमाचे त्यांनी पालन केले. त्यांच्या या विशेष योगादानाची दखल घेत त्यांचे कौतुकास्पद अभिनंदन करतो व आभार व्यक्त करतो.

अंतत: या संशोधन अहवाल लेखन पश्चात संपादन करण्यासाठी विशेष परिश्रम घेणारे डॉ दत्तात्रय ह. पवार, सेवा निवृत्त प्राध्यापक व प्रमुख, कृषी विदयाशाखा यांचे विशेष आभार मानतो. तसेच अहवालास टंकन करून योग्य प्रकारे तयार करणारे व्यक्ति तसेच प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या सहयोग करण्या-या सर्व वाल्मी अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मन:पूर्वक आभार व कृतज्ञता व्यक्त करतो. या संशोधन अहवालाचा मुख्य उददेश्य प्रगतिशील शेतक-यांच्या प्रशिक्षण कार्यक्रमांचा प्रभाव जाणुन घेण्याचा असला तरी या अहवालातील परिणाम व त्यांची व्याप्ती फार मोठी आहे. राज्याचे पाणी विषयक धोरण शेतक-यांपर्यंत पोहचत असल्याची ग्वाही आंशिकरित्या या अहवालातुन होत आहे. त्यामुळे प्रशिक्षणातून परिवर्तन या तत्वास दृढ करणारा हा अहवाल असून वाल्मीच्या प्रशिक्षणांची उज्वल परंपरा निरंतर ठेवण्याच्या गरजेस अधोरेखित करणारा आहे. वाचकांना नम्र विनंती आहे की त्यांनी आपल्या प्रतिक्रिया अवश्य कळवाव्यात जेणे करून भविष्यात अधिक चांगल्याप्रकारे संशोधनाच्या माध्यमातुन उपयुक्त प्रकाशने निर्माण करण्याची स्वस्थ परंपरा संस्थेत जोपासता येईल. धन्यवाद,

दिनांक:१२.१०.२०१९
स्थान : औरंगाबाद

**सही/-**
**(डॉ. राजेश पुराणिक)**
**प्राध्यापक व प्रमुख व संशोशन अभ्यास मार्गदर्शक**
**सा.शा.वि.शा. वाल्मी, औरंगाबाद**